
# ॥ शिवसेवा प्रतिष्ठान ॥

नोदणी क्र. महा /२६२ /२०१७ / पुणे

# सेवाकार्य वार्तापत्र

## २०२१-२२ ( अंक २ रा )




**संपर्क पत्ता:** स २, दामोदर कॉलनी, मि.न. naM. २४३/८, ए वार्ड, लोणावळा, ता. मावळ, जि .पुणे ४१०४०१.
**संपर्क क्रमांक: ९९२३१७३७५३ / ९९२१०५००२१**

# कोरोना आपत्ती सहाय्यता

**सेवा है यज्ञकुंड समिधासम हम जलें | ध्येय महासागर में सारितारुप हम मिले||**

**ऑक्सिजनची आवश्यकता दिवसेंदिवस वाढत होती** त्यावेळी करोना बाधितांना राज्यात ऑक्सिजन उपलब्ध होत नव्हता. ऑक्सिजन अभावी रुग्णांना आपले प्राण गमवावे लागत होते.

**'शिवसेवा प्रतिष्ठान'** ऑक्सिजन तयार करणाऱ्या मशीन (Oxygen Concentrators) विविध रुग्णालयात देण्याचे ठरवले. या मशीन हवेतील ऑक्सिजन वेगळा करतात व रुग्णाला देतात. पहिल्या टप्यामध्ये लोनावळा, कामशेट, तळेगाव, येथे काही करोंना सेंटर / हॉस्पीटलला फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फांउडेशनच्या उपक्रमाअंतर्गत व यांच्या सहकार्याने देण्यात आल्या. करोनाशी लढण्याची ही उपकरणे रुग्णालयात देण्यात येत होती. **'शिवसेवा प्रतिष्ठान'** ने मावळातील आवश्यकता कळवुन ही उपकरणे लोणावळा, कामशेट, तळेगाव, सोमाटणे फाटा, येथील हॉस्पीटल मधे लवकरात लवकर पुरवली जातील असे पाहीले, जेणेकरुन मावळातील सर्वसामान्य लोकांना त्याचा जास्तीत जास्त लाभ मिळत होता.

**दि. १८ मे २०२१ ला, ओम हॉस्पीटल, सोमाटणे फाटा, कोवीड केअर सेंटर- तळेगाव, सपना हॉस्पीटल, खंडाळा, ओंकार हॉस्पीटल, कामशेट, समर्थ हॉस्पीटल, तळेगाव, या सर्व हॉस्पीटल मध्ये हि उपकरणे दिली गेली.** या विषया मध्ये संस्थेचे सर्व सदस्य, कार्यकर्ते सहभागी झाले होते.










# करियर मार्गदर्शन







लोणावळा-कर्जत घाटातील नागनाथ आणि ठाकुरवाडी येथील १०वी च्या पुढील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी दि. ०३ जानेवारी २०२१ रोजी सकाळी १०:०० वाजता लोणावळा रेल्वे स्टेशन परिसरात करियर मार्गदर्शन कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती.

प्रो. श्री. नवले सर तसेच प्रा. एन. डी. पाटील, यांनी आपल्या अमोघ वाणीने आणि अनुभवी बोलांनीं आलेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनींना माहीती दिली तथा प्रोस्ताहित केले.

या कार्यक्रमात मुलांना पुण्यातील **'वंदे उत्कल भारती'** संस्थेकडून थंडीचे गरम कपडेही देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी संस्थेचे सर्व सदस्य, कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.

॥ शिवसेवा प्रतिष्ठान ॥

# शालेय साहित्य वाटप





उंबरविरा येथील राज्य जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना पालकांच्या आर्थिक परिस्थितीमुळं आवश्यक शालेय साहित्य मिळणं दुर्लभ आहे असे समजल्यावर प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना **पुण्यातील 'सेवा सहयोग फाऊंडेशन'** संस्थेच्या मदतीने शालेय साहीत्य देण्यात आले.

दि. १३ सप्टेंबर २०२१ रोजी **"शिवसेवा प्रतिष्ठान'** च्या कार्यकर्त्यांनी शाळेत जाऊन या साहित्याचे वाटप केले. सर्व सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी केला..








# मायेची ऊब





दि. २५ डिसेंबर २०२१ रोजी नागनाथ येथे **'शिवसेवा प्रतिष्ठान'** तर्फे मायेची ऊब म्हणजे ब्लँकेट व कानटोपीचे वाटप करण्यात आले. आपण सर्वांनी हाती घेतलेले शाळेच्या कामास वेग मिळत आहे. आपले अध्यक्ष श्री धनंजय चांद्रत्ते यांनी कामाचा आढावा घेतला. नागनाथ ग्रामसेवक व सरपंच तसेच गट विकास अधिकारी खालापूर यांना पत्र देण्यात आले.







# प्राचिन भारत




भारताच्या स्वातंत्र्याचे ७५ वे अर्थातच अमृत महोत्सवी वर्ष आपण साजरे करत आहोत. यावेळी प्राचीन भारताचे वैभव आपण आठवलेच पाहिजे. **'प्राचिन भारत'** केवळ उच्चारताच वैभव लक्षात याव अस नाव, प्रचंड मोठा मुलुख, गौरवशाली परंपरा, प्रांताची अन देशांची ऐतिहासीक जुनी नाव, शहरांची बदलायच्या आधीची जुनी नावं.. मनात येणारे अनेक अनेक प्रश्न... हे सर्व एकाच चित्रात बघायला मिळालं तर??

"Creative Thoughts" ने खुप विचार करून हे वैभव आपल्या सर्वांचा भेटीसाठी ६'x८' (फुट) अशा भव्य आकारात उपलब्ध केले आहे. भारत मातेच प्राचिन वैभव सर्वांना दिसू द्या अन माहिती होऊ द्या. या उपक्रमाअंतर्गत '**सेवाधाम ट्रस्ट**' येथे नकाशा देण्यात आला.






|| शिवसेवा प्रतिष्ठान ||

# वृक्षारोपण

यावर्षी २१ जुलै २०२१ रोजी सुध्दा '**शिवसेवा प्रतिष्ठान**' मार्फत लोणावळयातील नांगरगाव येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (ITI) येथे, आणि अन्य काही ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. विविध जातीची सुमारे २०० रोपे यावेळी लावण्यात आली. '**लोणावळा खंडाळा फोरम**' ने या उपक्रमाकरिता सर्व रोपे उपलब्ध करून दिली. सध्या '**ग्रीन-आय टी आय**' **ही संकल्पना** राबवण्यात येत आहे. त्यानुसार या सर्व रोपांचे संवर्धन करून त्याची वाढ योग्य पद्धतीने करण्यात येणार आहे.

'**शिवसेवा प्रतिष्ठान**' च्या सर्व सदस्यांनी आपला वेळ देऊन कार्यक्रम यशस्वी केला..



# दिपावली स्नेहमिलन

## 'चलो जलाये दिप वहां, जहां अभी भी अंधेरा है!'

लोणावळा-कर्जत घाटातील नागनाथ आणि ठाकुरवाडी च्या बंधु-भगिनीं बरोबर दिपावली साजरी करण्यासाठी **'शिवसेवा प्र तिष्ठान'** चे बहुतेक सर्व कार्यकर्ते यांनी शक्यतो सहपरिवार रविवार, दि. ७ नोव्हेंबर २०२१ रोजी जाण्याचे निश्चित केले. येताना प्रत्येकाने एका परिवाराचा फराळ बरोबर आणला होता. ठरल्याप्रमाणे सर्वजण नागनाथला पोहचले. आम्ही सर्वानी आणलेला दिवाळी फराळ, सर्व गावाला वाटला गेला. छोटया मित्रांनी तर तिथच खाऊ खायला सुरवात ही केली. हे सर्व तर फक्त साधन.





आम्हा सोबत आलेल्या Architects च्या Team चे काम सर्वात महत्वाचे होते. कारणही तसंच महत्वाचं. दोन वर्षा पुर्वी निसर्ग वादळामुळे गावातल्या शाळेचे भयंकर नुकसान झाले. छप्परच नाही तर शाळा कसली? विद्यार्थ्यांचे फारच बिकट हाल होते. आम्ही तेथे पोहोचल्यावर Architects Team ने त्यांचे काम सुरुही केले. पाहणी सुरू केली. वादळात गावची शाळा पडली होती. तेव्हापासुन आजपर्यंत मुलांची शाळा घरांमध्ये भरत होती. तातडीनं शाळा दुरुस्त करणे, मुलांनी पुन्हा शाळेत जाणे, हा संकल्प केला! Architect ची visit, शाळेच मोजमाप हे त्या संकल्पातले पहिले पाऊल!. सर्वानी नागनाथ आणि ठाकुरवाडी च्या बंधु-भगिनीं बरोबरच भोजन घेतले. गावकऱ्यांनी प्रेमाने सर्वासाठी केलेले स्वादिष्ट जेवण. वाह!! क्या बात है..! गावातल्या सर्व तरूणांची मिटींग घेऊन शाळेच्या अन विहीरीच्या कामाला गावच्या प्रत्येक घरातुन रोज दोन तास काम करण्याच्या मोठ्या आवाजातला संकल्प दिवाळी सफल करुन गेला. गरज आहे तिथपर्यंत पोहचणं, त्यांची आवश्यकता ओळखुन ती पुरवण्याचा प्रयत्न.., खर तर हा 'प्रयत्न' ह्याचच नाव सामाजिक कार्य असाव.







# e-Learning संच, शिधा वाटप

गेले अनेक महिने करोना मुळे शाळा बंद आहेत. शहरी भागातील मुले घरातुनच स्मार्ट फोन, टॅब, कॉम्पुटर, लॅपटॉप वर शिक्षण घेत आहेत.पण आपल्या नागनाथ (खंडाळा घाट) सारख्या दुर्गम जंगल भागात आदिवासींच्या मुला / मुलीनी काय करायच? शिक्षणाच खुप नुकसान होत होत.




यासाठी '**शिवसेवा प्रतिष्ठान**' च्या सदस्यांनी तिथल्या शिक्षकांशी संपर्क केला, चर्चा केली. **स्मार्ट TV आणि e-Learning सेट ने** शिक्षण सोप होऊ शकते, असे सर्वांच्या लक्षात आले. तातडीने कृती करून '**शिवसेवा प्रतिष्ठान**'ने रविवार, दि. २० जून २०२१ नागनाथ च्या शाळेला हा पुर्ण सेट दिला, जेणे करून विद्यार्थ्यांचं होणार नुकसान टळेल. या प्रोजेक्ट मध्ये अनेकानी मदत केली.

दि. ९ जुलै २०२१ रोजी, '**शिवसेवा प्रतिष्ठान**' व सन्माननीय नगरसेविका सौ.ब्रीन्दाताई गणात्रा यांच्या संयुक्त विद्यमाने बोरघाटाच्या कुशीत वसलेल्या अतिदुर्गम परंतु निसर्गरम्य अशा नागनाथ गाव (ता. कर्जत, जिल्हा रायगड) येथील आदिवासी पाड्यातील ६० कुटुंबांना अन्नधान्य कीट व तेथील पाड्यातील लहान मुलांना खाऊ वाटप करण्यात आले, तसेच संस्थेने शाळेला दिलेल्या e-Learning सेटच्या वापराची पहाणी करण्यात आली.



*'चलो जलाये दिप वहां,*
*जहां अभी भी अंधेरा है!'*



# वृत्तपत्रानी घेतलेली दखल




पुण्यनगरी

## आदिवासींना किराणा साहित्याचे वाटप



**लोणावळा** : लोणावळा ग्रामीण भागातील कुरवंडे, ओळकाईवाडी, डोंगरगाव, जेवरेवाडी, करंडोली कार्ला, देवले, पाटण, औंढे औंढोली, भाजे, देवघर, वाकसई, येथील ३०० ते ३५० आदिवासी बांधवाना लोणावळा येथील नगरसेविका बिंद्रा गणात्रा व शिवसेवा प्रतिष्ठानच्या वतीने अन्नधान्य कीटचे वाटप करण्यात आले. कोरोनाच्या संसर्गामुळे हातावर पोट असणाऱ्या अदिवासी बांधवांवर उपासमारीची वेळ आली असून अशा गरीब बांधवांच्या एक वेळच्या जेवणाचीही सोय होत ... महिन्यांपासून एक महिना पूरेल इतके ... वाटप करण्यात येत आहे. गरजु बांध... खोपोली नागनाथ परिसरातील अदि...

## शिवसेवा प्रतिष्ठानच्या वतीने औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात वृक्षारोपण

लोणावळा, दि. २५ : शिवसेवा प्रतिष्ठानच्या वतीने नांगरगाव येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी दोनशे रोपे लावण्यात आली. लोणावळा खंडाळा सिटीझन फोरमने याकरिता रोपे उपलब्ध करून दिली. सध्या ग्रीन ... त्याची योग्य वाढ करण्यात येणार आहे.

यावेळी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्ष... सहसंचालक अनिल गावीत, प्राच... पांडुरंग देशमाने, गटनिदेशक पासर... साबळे, सहाय्यक भांडारपाल शेखर पा... शिवसेवा प्रतिष्ठानच्या श्रीमती सि... साखळकर, महेश थत्ते, माजी नगरसे...

## ...महिन्याचा किराणा

...ही ठप्प आहे. ...कार्यरत आहेत. ...कण माध्यावर ...व ठाकुरवाडी ...दळणवळणाची ...संपर्क तुटला ...वे मार्गांचाच ...ऱ्याने रेल्वेच्या ...सोसिएशनच्या ...येत स्टेशन मास्तर असोसिएशन व शिवसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय चंद्रात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली नागनाथ येथे वसलेल्या २० आदिवासी कुटुंबांना ही मदत केली. देशभरातील ३९ हजार स्टेशन मास्तरांनी पुढील तीन महिने आपला एक दिवसाचा पगार मिळून २१ कोटी रुपयांचा निधी राष्ट्रसेवा म्हणून पंतप्रधान मदत निधीसाठी दिला आहे.

## परीक्षेच्या माध्यमातून नोकरी मिळवणे शक्य

**उत्तम बोडके : शिक्षण घेऊन बढत्या मिळव्या**

लोकमत न्यूज नेटवर्क

पिंपरी : तात्पुरत्या नोकरीच्या मागे लागून तरुण सरकारी नोकरीकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे करिअरच्या सुवर्णसंधी गमावतात. यासाठी नियमित अभ्यास करावा. योग्य पद्धतीने प्रवेश आणि पात्रता परीक्षा पास होऊन सरकारी सेवेत रुजू व्हावे. त्यानंतर आपल्या आवडीनुसार उच्चशिक्षण घेऊन बढत्या मिळवित उत्तम पद्धतीने करिअर करावे, असे आवाहन रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक उत्तम बोडके यांनी केले.

निगडी, प्राधिकरणातील स्वातंत्र्यवीर सावरकर स्पर्धा परीक्षा विभाग आणि शिवसेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित मराठी तरुणांसाठी शासकीय नोकरी या विषयावर कार्यशाळेत ते बोलत होते. मंगळवारी झालेल्या कार्यक्रमाला मंडळाचे ... धनसल, भास्कर रिकामे, रमेश ...पवार, चंद्रशेखर तिवारी, संजय ...पुरे, उल्हास कुलकर्णी उपस्थित होते.

बोडके म्हणाले, "सध्या रेल्वेमध्ये एक लाख तीस हजार विविध प्रकारची पदे भरली जाणार आहेत. रेल्वेप्रमाणे अलीकडच्या काळात केंद्र सरकारच्या सर्वच विभागात लहान मोठ्या प्रमाणात सर्व पदांची भरती सुरू आहे. यापुढेही सुरूच राहणार आहे. यासाठी होणाऱ्या प्रवेश परीक्षेला बसणे, त्यासाठी आवश्यक असणारे फॉर्म भरणे आवश्यक आहे."

शिवसेवा संस्थेचे अध्यक्ष धनंजय चंद्रात्रे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. प्रदीप पाटील यांनी प्रास्ताविक केली. नेहा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवसेवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सावरकर मंडळाचे कर्मचारी वर्ग यांनी मेहनत घेतली.

> बोडके म्हणाले, "सध्या रेल्वेमध्ये एक लाख तीस हजार विविध प्रकारची पदे भरली जाणार आहेत. रेल्वेप्रमाणे अलीकडच्या काळात केंद्र सरकारच्या सर्वच विभागात लहान मोठ्या प्रमाणात सर्व पदांची भरती सुरू आहे. यापुढेही सुरूच राहणार आहे."



शिलाटणेतील अदिवासी बांधवांना ... करण्यात आले.

## कार्ला, देवले भागात ...

कार्ला : लोणावळा ग्रामीण भागातील ... औंढोली, भाजे, देवघर, वाकसई, कुर... डोंगरगाव, जेवरेवाडी, करंडोली येथील ... बांधवांना लोणावळा शिवसेवा प्रतिष्ठान... वाटप करत मदतीचा हात दिला. शिवसे... यांच्या वतीने गेल्या एक महिन्यापासून ... वस्त्यांवर जाऊन एक महिना पुरेल इतके ... किट वाटप केले आहे. यावेळी नगरसेविका बिंद्रा गणात्रा, उद्योजक रमेश पाळेकर, माजी उपसरपंच तानाजी येवले, सुनील दळवी, सदस्या सोनाली येवले, शिवसेवा प्रतिष्ठानचे राजेश येवले, आशिष मेहता, अजित ...

## ...अन्नधान्य किट

...लोणावळा व ग्रा... ...सैनिक अल्पम...





# आवाहन

**"शिवभावे जीवसेवा"** हा मंत्र घेऊन **"शिवसेवा प्रतिष्ठान"** सातत्याने कार्यरत आहे. समाजोत्थानाच्या या कार्यात जेवढा अधिक जणांचा सहभाग वाढेल तेवढे हे कार्य सुलभ, समाधानकारक होईल. हा जगन्नाथाचा रथ आहे, अखंड ओढावा लागणार आहे. आपल्या सारख्यांच्या हस्ते-परहस्ते सहकार्यानेच ही पूर्तता होऊ शकते, पूर्णत्वास जाऊ शकते. **या कार्यात पुढीलप्रमाणे आपल्याला सहभाग घेता येईल..**

## आपण काय करू शकतो...

- स्वतः सदस्य होणे व सदस्य वाढवणे.
- उपक्रमात सक्रीय सहभाग घेणे
- संस्कार वर्ग चालवणे
- ग्राम विकास
- अभ्यासीका चालवणे
- वृक्षरोपण व संवर्धन
- रक्तगट सूची
- शासकीय नोकऱ्यांचा प्रचार आणि प्रसार
- राष्ट्रीय व प्रेरणा दिन साजरा करणे
- तरुणांना विविध विषयात मार्गदर्शन
- वाचनालय

**संस्थेच्या खात्यात स्वच्छेने आर्थिक देणगी थेट ऑनलाईन जमा करू इच्छिणाऱ्यांसाठी.**

**॥ शिवसेवा प्रतिष्ठान ॥**

**भारतीय स्टेट बँक**

Current A/C No - **38250999706**

IFS Code - **SBIN0006735**

लोणावळा

**संपर्क पत्ता:** स २, दामोदर कॉलनी, मि.न. naM. २४३/८, ए वार्ड, लोणावळा, ता. मावळ, जि .पुणे ४१०४०१.

**संपर्क क्रमांक:** ९९२३१७३७५३ / ९९२१०५००२१